# जिल्हा परिषद, बीड
## सामान्य प्रशासन विभाग

फोन 02442-222342, फॅक्स 222205 ई-मेल आयडी zp.beed@maharashtra.gov.in


क्र.जिपबी/साप्रवि/आस्था-07 काव- / / 2022 4096 दिनांक:- ऑगस्ट, 2022 4 AUG 2022

## जाहीर प्रगटन

मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. २०२२/विशा कक्ष ६/विधी/कावि ६३०-३७ दि.२५/७/२०२२ अन्वये कोरोना परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विभागीय चौकशीच्या सुनावण्या घेता न आल्याने सहाय्यक आयुक्त(चौकशी), यांच्याकडे प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणे निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य सेवा वर्ग-१ मधील सेवानिवृत्त अधिकारी यांची शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. डीईएन १०००/प्र.क्र. ५८१/२० मंत्रालय ,मुंबई दि. १९ जानेवारी २००१ , ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन पूरक पत्र क्र. डीईएन १००३ प्र.क्र. ४६२ आस्था १२ मंत्रालय ,मुंबई दि. १३ ऑक्टोबर २००३ व सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. एसपीओ २८०४/प्र.क्र. ११/२००४/११ मंत्रालय मुंबई दि. २६ मे,२००६ अन्वये जिल्हा परिषद, बीड अंतर्गत येणा-या वर्ग ३ व वर्ग ४ मधील कर्मचा-यांचे विभागीय चौकशी प्रकरणामध्ये चौकशी करुन चौकशी अहवाल शिस्तभंग विषयक प्राधिका-याकडे सादर करणेसाठी कंत्राटी पध्दतीने विशेष चौकशी अधिकारी महाराष्ट्र राज्य सेवा वर्ग १ मधील सेवानिवृत्त अधिका-याची विशेष चौकशी अधिकारी (कंत्राटी) म्हणून मानधनतत्वावर नियुक्ती करावयाची आहे. सदरील नियुक्ती ही खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार करण्यात येणार आहे.

१. शासन निर्णय दि. २८ ऑक्टोबर, २००९मधील तरतुदीनुसार प्रत्येक विभागीय चौकशी प्रकरण निकाली काढणेसाठी एक अपचारी कर्मचारी असेल तर प्रती प्रकरण रु. ८०००/- व एका पेक्षा जास्त अपचारी कर्मचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे १०००/- रु इतके वाढीव मानधन मुळ मानधनाच्या रक्कमेत वाढवून देण्यात येईल.मात्र सदर वाढीव मानधनाची कमाल मर्यादा रु. १५०००/- इतकी राहील.
२. विशेष चौकशी अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू राहणार नाही.
३. प्रत्येक विभागीय चौकशी प्रकरण ३ महिन्याच्या आत अंतीम करणे बंधनकारक राहील.
४. नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याचे वय दि. ३१/७/२०२२ रोजी ७० वर्षापेक्षा जास्त नसावे.
५. विशेष चौकशी अधिकारी (कंत्राटी) यांची नियुक्ती बाबत मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे मान्यतेनंतर नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.
६. सदरील विशेष चौकशी अधिका-याची नेमणूक ही नियूक्ती आदेशापासून फक्त एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील त्यानंतर आवश्यकता वाटल्यास मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या संमतीने आणखी एक वर्षासाठी फेर नियुक्ती करण्यात येईल.
७. उक्त नमूद शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र अर्जाबाबत शिफारस करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांना राहतील.

करीता इच्छुक सेवानिवृत्त महाराष्ट्र राज्य सेवा वर्ग- १ अधिकारी यांनी खालील तपशीला प्रमाणे आपला अर्ज दि. १९/८/२०२२ रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुटया वगळून)उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जि.प.बीड यांच्या कार्यालयात सादर करावा.

### अर्जामध्ये आवश्यक तपशील

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | सेवा निवृत्त अधिका-यांचे पूर्ण नाव /पूर्ण पत्ता (मोबाईल संपर्कासह) | |
| २ | वर्ग १ पदावरील नियुक्ती दिनांक/ आदेशाची छायांकित प्रतीसह | |
| ३ | सेवानिवृत्ती वेळेचे पदनाम | |
| ४ | ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नाव व पत्ता | |
| ५ | सेवा निवृत्तीचा दिनांक/ सेवानिवृत्त आदेश | |
| ६ | यापूर्वी विशेष चौकशी अधिकारी म्हणून केलेल्या कामाचा अनुभव | |

अजित पवार (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, बीड